# अनामप्रेम स्नेहवार्ता




## अनामप्रेम
## मासिक वृत्तपत्रिका

**JUNE - 2026**

# आर्थिक साक्षरता शिबिरातून विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन..







अनामप्रेम संस्थेच्या हिम्मतभवन प्रकल्पात आर्थिक साक्षरता केंद्र, राहुरी यांच्या वतीने आर्थिक साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

मा. शिवराज चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना बचत, विमा, गुंतवणूक, कर्ज, पेन्शन योजना, सुरक्षित बँकिंग व्यवहार, सायबर फसवणूक आणि वैयक्तिक आर्थिक नियोजन याविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले. संस्थेच्या कार्याचे कौतुक करत त्यांनी भविष्यातही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले तसेच विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप केले.

## अनामप्रेमच्या अंध विद्यार्थ्यांना 'केदारेश्वर कम्प्युटर इन्स्टिट्यूट'ची मोलाची साथ.

अनामप्रेम संस्था, गांधी मैदान येथे केदारेश्वर कम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या संचालिका सौ. शारदा जगदाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी अंध विद्यार्थ्यांसाठी अत्यंत अल्प दरात टायपिंग प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.





## टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या प्रतिनिधींची अनामप्रेमला सदिच्छा भेट

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS), मुंबई येथील प्रतिनिधींनी अनामप्रेम संस्थेच्या प्रकल्पाला सदिच्छा भेट दिली. संस्थेचे विविध उपक्रम, दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, प्रशिक्षण व स्वावलंबनासाठीचे कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चप्पल, क्रॉक्स आणि नॅपकिन बुके यांची खरेदी करून विद्यार्थ्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन दिले. संस्थेच्या कार्याचे मनापासून कौतुक करत त्यांनी भविष्यात पुन्हा भेट देण्याची इच्छा व्यक्त केली.





## बारावीतील गुणवंतांसह अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा गौरव

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील शैक्षणिक संस्था व 104 FM यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात बारावीत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांसह अनामप्रेम संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे मान्यवरांनी कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्राचेही आयोजन करण्यात आले, ज्यातून उच्च शिक्षण व रोजगाराच्या विविध संधींबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली.










# अनामप्रेम संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न..

अनामप्रेम संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे उत्साहात पार पडली. अहिल्यानगर, पुणे व मुंबई येथील विश्वस्त तसेच मान्यवर प्रत्यक्ष व ऑनलाइन सहभागी झाले.

सभेमध्ये संस्थेच्या भावी वाटचालीबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी संस्थेच्या वार्षिक अहवाल व माहितीपटाचे लोकार्पण करण्यात आले तसेच नवीन विश्वस्त मंडळाची निवड करण्यात आली. आगामी सेवाकार्यासाठी सर्व उपस्थितांनी शुभेच्छा देत संस्थेच्या कार्याला अधिक बळ मिळावे, अशी भावना व्यक्त केली.



स्टारलाईट दिव्यांग ट्रस्ट यांच्या सौजन्याने तसेच स्वर्गीय महेश भागवत सर यांचा स्मृतिदिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अंध विद्यार्थी तसेच अंध पालकांच्या मुलांना स्कूल बॅग चे वाटप करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमात अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांनाही स्कूल बॅग मिळाल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध होण्यास मदत झाली.

## अनामप्रेमच्या विद्यार्थिनींचे राज्यस्तरीय स्पर्धेत दैदिप्यमान यश

पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने उल्हासनगर, मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय चॅम्पियनशिपमध्ये अनामप्रेमच्या विद्यार्थिनींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उल्लेखनीय यश संपादन केले.

पहिल्या सामन्यात अनामप्रेमने मुंबई संघावर १९ गोल करत दणदणीत विजय मिळवला, तर दुसऱ्या सामन्यात नागपूर संघाविरुद्ध ११ गोल करून आपले वर्चस्व कायम राखले. या विजयी संघात कल्पना कदम, आरती दामोदर, भाग्यश्री उत्तेकर आणि राधा यादव या विद्यार्थिनींचा समावेश होता. त्यांच्या या यशामुळे अनामप्रेम परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.






www.anamprem.org

# समाजसेवेच्या वाटचालीला सदिच्छा भेटीतून नवी प्रेरणा.
























## डॉक्टर्स डे निमित्त अनामप्रेममध्ये भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर

'डॉक्टर्स डे' निमित्त अनामप्रेम संस्था आणि इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी मैदान प्रकल्पात दिव्यांग विद्यार्थी, लाभार्थी आणि कार्यकर्त्यांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. नगरमधील १४ तज्ज्ञ डॉक्टरांनी बालरोग, स्त्रीरोग, दंत, नेत्र, रक्तदाब, मधुमेह आदी विविध आजारांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला व उपचारांबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. धनंजय कुलकर्णी आणि डॉ. मेघना मराठे यांच्या विशेष पुढाकारामुळे शिबिराचे यशस्वी नियोजन झाले. या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध झाली. उपस्थित डॉक्टरांनी सामाजिक बांधिलकी जपत भविष्यातही अशा सेवाभावी उपक्रमांना सातत्याने सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. अनामप्रेमच्या सर्व लाभार्थ्यांसाठी हे शिबिर आरोग्यदायी, उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरले.







## दिव्यांग बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाची दारे उघडूया.

नगर जिल्ह्यात दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण सुरू असून, शिक्षणापासून वंचित असलेल्या दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनामप्रेम संस्थेच्या शाळेच्या टीमकडून विविध तालुक्यांमध्ये भेटी, पालकांशी संवाद आणि शाळांशी समन्वयाचे काम सुरू आहे.

# अनाम प्रेम परिवाराचे लेकी-जावयांना वाणदान

## अधिक मासानिमित्त आयोजन, उत्साहात झाला सोहळा



अहिल्यानगर (प्रतिनिधी) – अधिक मासानिमित्त येथील अनाम प्रेम परिवाराद्वारे लेकी-जावयांसाठी स्नेहपूर्ण वाणदान सोहळा नुकताच झाला. यानिमित्ताने औक्षण, उखाणे आणि प्रेमाच्या वर्षावात नातेसंबंधांचा अविस्मरणीय उत्सव रंगला. प्रेम, आपुलकी, संस्कार आणि कौटुंबिक नात्यांचा हा हृद्य सोहळा ठरला. फुलांच्या मनमोहक सजावटीने, रंगीबेरंगी रांगोळ्यांनी आणि मंगलमय वातावरणाने सजलेल्या सभागृहात प्रत्येक लेकी-जावयाचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. त्यांच्या ताटाभोवती काढलेल्या आकर्षक पुष्परांगोळ्यांनी कार्यक्रमाला सौंदर्याची अनोखी किनार लाभली. या प्रसंगी प्रत्येक लेकी-जावयास साडी, कपडे आणि वाण प्रेमपूर्वक भेट देण्यात आले. विशेष आकर्षण ठरले ते जोडप्यांनी घेतलेले उखाणे. पारंपरिक शैलीत घेतलेल्या उखाण्यांमधून नात्यांचा गोडवा, परस्परांवरील प्रेम आणि कौटुंबिक संस्कारांचे दर्शन घडले. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात या सुंदर क्षणांचा आनंद लुटला. लाभार्थी जोडप्यांनी अनाम प्रेम परिवाराचे मनःपूर्वक आभार मानत, हा सन्मान आणि प्रेम आम्हाला आयुष्यभर स्मरणात राहील, अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अनाम प्रेमचे अध्यक्ष अजित माने, उपाध्यक्ष डॉ. प्रकाश शेठ, खजिनदार राधा मिलिंद कुलकर्णी, विश्वस्त अविनाश बोपर्डीकर तसेच अनिता अजित माने, डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड,

हस्मिता गांधी, संतोष चोपडा, उज्वल देसाई, जाधव, अंबरीश कोतवाल, रेवती अद्वैत क्षीरसागर, माधुरी चितळे, श्रीकांत कुलकर्णी, विकास कंद, मिलिंद मापरा, अरविंद पटवर्धन, स्नेहल नारायण जाधव, गीता महाजन, ज्योती पुरी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी अध्यक्ष अजित माने म्हणाले, अनाम प्रेम परिवार सामाजिक बांधिलकी जपत अशाच उपक्रमांद्वारे माणुसकीची वीण अधिक मजबूत करत राहील.






# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.



छत्रपती संभाजीनगर येथील उद्योगपती श्री. रविंद्रजी मालानी यांच्या शालेय मित्रपरिवाराच्या "गुजराथी विद्या मंदिर 1982 बॅच" या समूहातर्फे अनामप्रेम संस्थेला किराणा साहित्य देणगीस्वरूपात प्रदान करण्यात आले.

श्री स्वामीनारायण हरि मंदिरात गुरु हरि परम पूज्य वशीभाई यांच्या ७४ व्या जन्मोत्सवानिमित्त श्री. जे आर मंत्री सर उपस्याथित होते यावेळी अनामप्रेम संस्थेच्या कार्याचा परिचय उपस्थित मान्यवरांना करून देण्याची संधी मिळाली. परम पूज्य वशीभाई यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा व विनम्र अभिवादन.





डॉ. राजीव शेलार (ऑर्थोपेडिक सर्जन), सौ. सुनीता शेलार तसेच संस्थेचे हितचिंतक श्री. जनार्दन पाटील यांची सदिच्छा भेट झाली.



## राज्यमाता गोमाता संवाद यात्रेत अनामप्रेमचा सहभाग

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा–2026' कार्यक्रमात अनामप्रेम संस्थेने सहभाग नोंदविला. कार्यक्रमात गोसेवा, गोसंवर्धन आणि जनजागृती या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखरजी मुंदडा तसेच उद्योजक श्री. राजेशभाई शहा यांची संस्थेच्या प्रतिनिधींनी भेट घेऊन अनामप्रेमच्या गोशाळेसाठी सहकार्याची विनंती केली. त्यानंतर श्री. विलास गुंजाळ यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांना संस्थेला भेट देण्याचे निमंत्रण देण्यात आले. पुढील काळात गोशाळेच्या विकासासाठी सकारात्मक सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण समितीच्या बैठकीत अनामप्रेमचा सहभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण समितीच्या आढावा बैठकीत अनामप्रेम संस्थेने सक्रिय सहभाग नोंदविला. बैठकीत दिव्यांग व्यक्तींना आयुष्मान भारत कार्ड, UDID ओळखपत्र, दिव्यांग तक्रार पोर्टल तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

# जिद्दीला लाभले अनामप्रेमाचे पंख...

## शुभांगी बाळू खोसे-वारकरी :
## संघर्षातून साकारलेले यशस्वी जीवन



"अंधार कितीही गडद असला, तरी जिद्दीचा एक किरण संपूर्ण आयुष्य उजळवून टाकतो."

आज आपण अशाच एका जिद्दीच्या, आत्मविश्वासाच्या आणि यशाच्या प्रवासाविषयी जाणून घेणार आहोत. ही कथा आहे कु. शुभांगी बाळू खोसे (सौ. शुभांगी विष्णू वारकरी) यांची.

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या या छोट्याशा खेडेगावात शुभांगीचा जन्म झाला. दोन भावांच्या कुटुंबात जन्मलेल्या शुभांगीला जन्मतःच एका डोळ्याने अंधत्व होते. लेकीचे हे दिव्यांगत्व पाहून आई-वडिलांच्या मनात प्रचंड नैराश्य दाटून आले.

"समुद्रातील तुफानापेक्षा, मनातील वादळे अधिक भयानक असतात."

या उक्तीप्रमाणे त्यांची अवस्था झाली होती. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. आई-वडील शेती करून संसाराचा गाडा ओढत होते. दिवसेंदिवस शुभांगी मोठी होत होती; पण तिच्या शिक्षणाचा प्रश्न मात्र अधिकच गंभीर होत चालला होता. गावात अंध विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळा नव्हती आणि भविष्यात तिचे काय होणार, ही चिंता आई-वडिलांना सतावत होती.

अनामप्रेमची भेट... आणि आयुष्याला मिळाले नवे वळण

एक दिवस अनामप्रेम संस्थेचे शिक्षक आणि कार्यकर्ते विशेष शाळेसाठी विद्यार्थ्यांचा सर्वेक्षण करण्यासाठी पाडळी दर्या येथे आले. त्यांनी शुभांगीच्या पालकांना अनामप्रेम संस्थेतील शिक्षण, निवास, संगोपन आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा यांची सविस्तर माहिती दिली.

या भेटीने शुभांगीच्या पालकांच्या मनातील शिक्षणाची चिंता दूर झाली. त्यांनी कोणताही संकोच न बाळगता शुभांगीला अनामप्रेम संस्थेत दाखल केले आणि याच क्षणापासून तिच्या नव्या आयुष्याचा प्रारंभ झाला.

शुभांगीचे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण महिला मंडळ शाळा, दिल्ली गेट, अहिल्यानगर येथे झाले. त्यानंतर आठवी ते दहावीचे शिक्षण पार्वतीबाई डहानुकर विद्यालयात पूर्ण झाले. पुढे तिने नगर कॉलेज, अहिल्यानगर येथून पदवी शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले

शुभांगी हळूहळू संस्थेच्या कुटुंबातील एक सदस्यच बनली. तिच्या शिक्षणासाठी संस्थेने सातत्याने प्रयत्न केले. पदवी पूर्ण झाल्यानंतर तिने विविध स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली आणि आत्मविश्वासाने पुढील वाटचाल सुरू ठेवली.

## संसाराची नवी सुरुवात

दरम्यान शुभांगी विवाहयोग्य झाली होती. तिच्यासाठी योग्य स्थळाचा शोध सुरू असतानाच बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील नायगाव (दत्तापूर) येथील श्री. विष्णू वारकरी, जे अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते, त्यांच्याशी तिचा विवाह निश्चित झाला.

५ ऑगस्ट २०२१ रोजी शुभांगी आणि विष्णू यांचा विवाह अत्यंत आनंदात संपन्न झाला. हा केवळ दोन व्यक्तींचा विवाह नव्हता, तर दोन जिद्दी मनांचा सुंदर मिलाफ होता.

"घरात लेकीचा आणि निसर्गात चिमण्यांचा चिवचिवाट असेल, तरच घर आणि निसर्ग दोन्ही पूर्णत्वाला जातात."

या उक्तीप्रमाणे त्यांच्या संसारात प्रथम एका कन्येचे आणि त्यानंतर दुसऱ्या कन्यारत्नाचे आगमन झाले. दोन्ही लेकींमुळे त्यांच्या आयुष्यात आनंदाचे नवे क्षितिज खुलले.

याच काळात शुभांगीच्या जिद्दीला आणखी एक यश लाभले. भगवंताच्या कृपेने आणि तिच्या अथक परिश्रमामुळे तिला ससून रुग्णालयात सरकारी नोकरी मिळाली.

## जिद्दीने घडवले प्रेरणादायी जीवन

आज शुभांगी अंशतः दृष्टिहीन आहे, तर तिचे पती विष्णू वारकरी दोन्ही पायांनी दिव्यांग आहेत. मात्र त्यांनी कधीही आपल्या दिव्यांगत्वाला कमकुवतपणा मानले नाही. उलट परिश्रम, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार यांच्या बळावर त्यांनी समाजात सन्मानाचे स्थान निर्माण केले आहे.



"आयुष्यात पाठिंबा देणारी माणसं सोबत असली की,
मनस्थितीबरोबर परिस्थितीही बदलते."

या विचारांचे जिवंत उदाहरण म्हणजे शुभांगी आणि विष्णू यांचा प्रवास. दोघेही आज गुण्यागोविंदाने संसार करत असून अनेक दिव्यांगांसाठी प्रेरणास्थान बनले आहेत.

शुभांगीचे अनामप्रेम संस्थेविषयी मनोगत

"निवडलेला रस्ताच जर सुंदर, प्रामाणिक आणि इमानदारीचा असेल, तर थकण्याचा प्रश्नच उरत नाही; सोबत कोणी असो वा नसो."

शुभांगी म्हणते—

"अनामप्रेम संस्था माझ्यासाठी केवळ एक संस्था नाही, तर माझ्या आयुष्याला नवी दिशा देणारे मायबाप आहेत. माझे शिक्षण, माझा आत्मविश्वास, माझ्या आयुष्यातील प्रत्येक यश आणि आजचा माझा सुखी संसार—या सर्वांचे श्रेय अनामप्रेम संस्थेलाच जाते. संस्थेने मला केवळ शिक्षण दिले नाही, तर स्वाभिमानाने जगण्याची ताकद दिली. माझ्या सर्वांगीण विकासामागे अनामप्रेमचे मोलाचे योगदान आहे. या संस्थेचे ऋण मी आयुष्यभर विसरू शकणार नाही."

शुभांगीची ही यशोगाथा सांगते—

"दिव्यांगत्व हे मर्यादा नसते; योग्य मार्गदर्शन, शिक्षण, कुटुंबाचा विश्वास आणि जिद्द यांच्या बळावर प्रत्येक स्वप्न सत्यात उतरु शकतो.

## संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.




**संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805**



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | **State Bank Of India** |
| Name Of Account | **ANAMPREM** |
| Branch | **Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar)** |
| Account No | **32144934687** |
| Account Type | **Current** |
| IFSC Code | **SBIN0014794** |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.